# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ १२/२०१४-१५/१२० दिनांक : ३१.७.२०१४

**आदेश केस क्र.१२/१४-१५**

श्री.संजीव शंकर थोरात,
गट नं.६६२,मु.पो.बोरगांव, ता.कवठेमहांकाळ,
जि.सांगली. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ. — विरुध्द पक्षकार

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ.

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**न्याय निर्णय**

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संजीव शंकर थोरात,मु.पो.बोरगांव,ता.कवठेमहांकाळ, यांनी वितरण कंपनी विभागीय कार्यालय,कवठेमहांकाळ, यांचेविरुध्द मंचाकडे दि.५.६.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

तक्रारदार यांची मौजे बोरगांव गट नं.६६२, येथे ३ एच.पी.चे शेतीपंपासाठीचे कनेक्शन असून (ग्रा.क्र.२७७७४०००२८६६) ते दि.२८.११.२०१२ रोजी देण्यात आले आहे. सदर कनेक्शनचा वीजपुरवठा हा वारंवार खंडित होत असून तो कमी दाबाने होत असल्याची तक्रार आहे. मंचाकडे तक्रार दाखल करणेपूर्वी तक्रारदाराने सांगली कक्षाकडे दि.२५.०२.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर कक्षाने २३.०४.२०१४ रोजी निर्णय दिला. सदर निर्णयावर नाराज होऊन ग्राहकाने कोल्हापूर मंच येथे तक्रार दाखल केली.

सदर तक्रारीची सुनावणी दि.१६.०७.२०१४ रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आली. सदर सुनावणीस तक्रारदार स्वतः हजर होते. वितरण कंपनीतर्फे श्री.मुदलीयार, कनिष्ठ अभियंता हे हजर होते. सुनावणीपूर्वी तक्रारीवरील कार्यकारी अभियंता,कवठेमहांकाळ, यांचे लेखी निवेदन सादर केले. ग्राहकाने त्यांचा विद्युतपुरवठा वारंवार खंडित होत असल्यामुळे तसेच कमी व्होल्टेज येत असल्यामुळे मोटार चालत नसल्याचे सांगितले. श्री. मुदलीयार, कनिष्ठ अभियंता, शा.का. शिरढोण, अंतर्गत कक्ष सांगली यांच्या आदेशानुसार दि.१८.६.२०१४ रोजी सदर १०० केव्हीए रोहित्रावरील लोड चेक केला असून तो ९० एच.पी.असल्याचे सांगितले. तसेच व्होल्टेजची तपासणी केली असता ते ४०० केव्ही असल्याचे सांगितले.  सदर रोहित्रास ३३/११ केव्ही बोरगांव उपकेंद्रातून निघणा-या ११ केव्ही बोरगांव फिडरवर विद्युतपुरवठा केला जातो. सदर फिडरवर १५० ॲम्पीयर लोड गेलेला आहे.

सुनावणीच्यावेळी श्री.मुदलीयार, कनिष्ठ अभियंता, यांना पुरक माहिती देणेबाबत सांगितले होते. ते त्यांनी दि.२२.७.२०१४ पर्यंत देणेचे कबुल केले होते. परंतु सदर माहिती वेळेवर न आल्यामुळे अंतिम निर्णय घेण्यात येत आहे.

सदर विवेचनावरुन मंच खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. वितरण कंपनीने उपकेंद्रातील स्टेशन कॅपॅसिटर व तसेच फिडरवरील ऑन लाईन कॅपॅसिटर चालू ठेऊन ग्राहकास योग्य दाबाने विद्युतपुरवठा करावा.

२. ग्राहकाने त्यांच्या शेतीपंपाच्या वीजजोडणीस योग्य त्या साईजचा कॅपॅसिटर बसवून घ्यावा. तसेच वायरिंग तपासून घ्यावे.

३. कनिष्ठ अभियंता यांनी ग्राहकासमवेत व्होल्टेज चेक करुन खात्री करावी.

४. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

सही/-
(जी.बी.पानकर )
सदस्य सचिव

श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.